# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र — जिल्हा District: मुंबई — पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. मुंबई — पहिली खबर क्र. FIR No.: 06 — वर्ष Year: 2026 — दिनांक Date: 17/03/20[illegible]

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम — कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act: ........ कलमे Sections: ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: दिनांक 11/12/2025 रोजी पासून ते दिनांक - 16/03/2026 रोजी — तारीख पासून Date from ........ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to ........ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. — तारीख Date: 19/01/2026 — वेळ Time: ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 08/26 — तारीख Date: 17/03/2026 — वेळ Time: 06:50 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: समक्ष — लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ — चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name — ठिकाणाचे नंबर No. if any — गल्ली Ward — रस्त्याचे नाव Name of road: खार पोलीस ठाणे मागील शासकीय वसाहत बिल्डिंग क्र 5 व 6 च्या मध्ये असलेले अधिकारी निवास कन्टेनर, खार, ...
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station — तालुका Taluka — जिल्हा Dist. — राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: दिपिका आनंदराव डोंगारदे — (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: आनंदराव डोंगारदे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 38 वर्षे — (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय — फोन नं. Phone No.: 95949684[illegible]
(e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation: नोकरी
(g) धर्म Religion: हिंदू — जात Caste: मराठा — जनजात Sub-Caste —
(h) पत्ता Address: आपलुधपरन प्रेम बंगलो [illegible], मुंबई ... गल्ली/सर्व्हे नं. Ward — घर/नावनि House Name/No. — फोन/मो. नं. Phone No. — पॅन नं. Pan No. — वोटर्स नं. Card No.
रस्त्याचे नाव Road: २१S वरळी मुंबई — जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

तुषार नानासाहेब काळे वय- 40 वर्षे व्यवसाय- नोकरी (सहा. पोलीस निरीक्षक) खार पोलीस ठाणे मुंबई, रा.ठि. फ्लॅट नं - 103, बिल्डिंग नं - 14, सागरदर्शन को-ऑ-हौ. सोसायटी, सेक्टर 10, [illegible] नवी मुंबई.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

यातील फिर्यादी नामे दिपिका डंगारवे, पोलिस निरीक्षक यांचा दिनांक 17/03/2025 रोजीच्या जबाब स्वतंत्र पानावर नोंदलेला असून ती गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष.

(रेखाबाई दुधभाते)
पोलिस निरीक्षक
गु. प्र. वि. मुंबई.

फिर्याद दिनांक १७/०३/२०२६

मी, दिपिका बाजीराव डंगारणे, वय ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक),नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मो.क्र. ९५९४९६८४५०.

मी वरील प्रमाणे असून, दिनांक २१/०८/२०२५ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक' या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक १९/०१/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना, मला व सपोआ प्रविण नावडकर यांना मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्र. ०४/२०२६ मध्ये पुढील कारवाईकरीता माझी तपासी अधिकारी व सपोआ प्रविण नावडकर यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन लेखी आदेश केल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री रफिक इब्राहिम तांबे वय- ५२ वर्ष यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी त्यांच्या स्वःहस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार अर्ज लिहून तो अर्ज आम्हास वाचण्यास दिला. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

तक्रारदार श्री रफिक इब्राहिम तांबे,वय- ५२ वर्ष,व्यवसाय- रिअल इस्टेट,राहणार २० काझी इस्टेट,तिसर मजला,नळ बाजार,गोल चौकी,मुंबई ४००००३ यांच्या राहत्या परीसरात दोन बिल्डींग असुन त्या भाडयाने दिल्या असुन त्यातुन मिळाणाऱ्या उत्पन्नावार कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

तक्रारदार यांचे वडील श्री.इब्राहिम सलाउद्दीन तांबे यांनी सन १९७९ मध्ये महाराष्ट्र फ्लोअर मिल, शॉप नं. ७०, प्लॉट नं. १९, सी.एस.टी. ७७९, ३ रा रोड, खार रोड, खार(प) मुंबई ४०००५२ ही प्रॉपर्टी नोंदणीकृत करारनामा करुन विकत घेतली होती. त्यांचे वडीलांचे निधन दिनांक १४/०१/१९८६ रोजी झालेले आहे. सदरची प्रॉपर्टी ही वडीलांचे नावावर असुन प्रॉपर्टीचे लाईट बिल व गुमास्ता हा तक्रारदार यांचा भाउ नामे नुर मोहम्मद इब्राहिम तांबे वय ५७ वर्षे याचे नावावर आहे. वर नमुद प्रॉपर्टीचा गुमास्ता व इतर कागदपत्रे ही इसम नामे गणेश लक्ष्मण भार्गव याने स्वत:च्या नावावर करुन कब्जा घेतला आहे म्हणुन तक्रारदार यांचा भाऊ नुर मोहम्मद तांबे याने गणेश भार्गव याच्या विरोधात सप्टेंबर २०२२ मध्ये मा. अति मुख्य महानगर दंडाधिकारी, ९ वे न्यायालय, बांद्रा येथे क्रिमिनल केस क. १२१/एस. डब्ल्यु/२०२२ अन्वये तकार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १०/१०/२०२५ रोजी मा. न्यायालयाने सी.आर.पी.सी.कलम २०२ प्रमाणे चौकशी करण्याचे आदेश खार पो. ठाणे, मुंबई यांना दिलेले आहेत. दिनांक ३०/११/२०२५ रोजी तक्रारदार यांचा भाऊ नुर मोहम्मद याने तक्रारदार यांना सांगितले की, त्याने गणेश भार्गव याच्या विरोधात न्यायालयामध्ये दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने खार पो. ठाणे येथील स.पो.नि. तुषार काळे यांनी त्याचा जबाब नोंद केचला असुन त्यावेळी त्याच्याबरोबर त्याचे वकील श्री मंथन होते.त्यावेळेस सपोनि काळे यांनी '' सदरचे काम करुन देतो तेवढे आमचे ही बघा '' असे सांगितले.

तक्रारदार यांचा भाऊ नुर मोहम्मद याने तक्रारदार यांस ,त्यास साहेबांशी बोलता येणार नाही व तो गोंधळुन जाईल म्हणुन काळे साहेबांची भेट घेण्यास सांगितले. त्यांनतर तक्रारदार यांनी काळे साहेबांना फोनवरुन संपर्क केला व त्यांनी भेटण्यास बोलावले असता, तक्रारदार हे काळे साहेबांना दिनांक ११/१२/२०२५ रोजी खार पोलीस ठाणे हददीत खार रेल्वे स्टेशन बीटचौकी,तिसरा खार रस्ता,खार पश्चिम,मुंबई या ठिकाणी सायंकाळी ५.३० वा प्रत्यक्ष जावुन भेटले. त्यावेळी काळे साहेबांनी तक्रारदार यांचा भाऊ नुर मोहम्मद याच्या प्रकरणाच्या चौकशीत त्याच्या बाजुने कोर्टामध्ये रीपोर्ट सादर करतो व त्यासाठी रू. ३,००,०००/- रक्कमेची मागणी केली.त्यावेळी तक्रारदार यांनी काळे साहेबांना त्यांचा भाऊ नुर मोहम्मद याच्याशी बोलणे करून कळवितो असे सांगितले. तदनंतर तक्रारदार यांनी घरी जावुन त्यांचा भाऊ नुर मोहम्मद यास काळे साहेब आपल्या बाजुने रिपोर्ट देण्यासाठी रु. ३ लाखाची मागणी करत असल्याचे सांगितले व तेव्हा त्याने पैसे देण्यास असमर्थता दर्शवुन तक्रारदार यांनाच काहीतरी बघ असे सांगितले.

तक्रारदार यांनी त्यांच्या प्रकरणाच्या सध्यस्थितीबाबत दिनांक २३ व २४/१२/२०२५ रोजी काळे साहेबांना फोन लावला असता , त्यांनी नाईट डयुटी केलेली असल्याचे सांगुन नंतर भेटण्यास बोलवतो असे सांगितले. तक्रारदार यांच्या प्रकरणामध्ये मा. न्यायालयात दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रिपोर्ट सादर करावयाचा होता परंतु काळे साहेबांनी रिपोर्ट सादर केला नाही. म्हणुन दिनांक १२/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांचा भाउ नुर याने पुन्हा काळे साहेबांना व्हाटस्अप कॉल केला मात्र त्यांनी तो घेतला नाही.तदनंतर पुन्हा तक्रारदार यांचा भाउ नुर याने दिनांक १६/०१/२०२६ रोजी काळे साहेबांना कॉल केला असता त्यांनी सध्या बंदोबस्त असुन बंदोबस्त झालेनंतर बोलावतो असे सांगितले. काळे साहेब हे तक्रारदार यांच्या प्रकरणाची चौकशीची माहीती देत नाहीत व त्यांनी तक्रारदार यांना त्यांच्या बाजुने कोर्टात रिपोर्ट सादर करण्याकामी रु. ३ लाख लाचेची मागणी केली असुन, ती देण्यास तक्रारदार व त्यांचा भाउ नुर मोहम्मद याची इच्छा नसल्याने दिनांक १९/०१/२०२६ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,

मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून खार पोलीस ठाणे येथील लोकसेवक सपोनि तुषार काळे हे लाच मागणी करत असल्याबाबत स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला.''

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. दिनेश कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. महेश शिवाजी नरवडे, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - कनिष्ठ लिपिक, म्हाडा पी.पी. डी.कार्यालय पत्ता - कलानगर बांद्रा, मुंबई ५१. रा.ठि - रूम नं. १०१, पहिला मजला, प्लॉट नं. ६४, पंचवटी बिल्डींग, सानपाडा, नवी मुंबई ४००७०५ २) श्रीमती रूपाली शंकर गागरे, वय ३२ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - वरिष्ठ लिपीक, कार्यालयीन पत्ता - प्रादेशिक परिवहन विभाग, अंधेरी ,मुंबई ५३. रा.ठि - ए/१०४, श्री गणेश को. ऑप. हौ. सोसायटी, मंडा टिटवाळा, पुर्व ठाणे यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून मी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सपोआ प्रविण नावडकर ,तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून मी सदरचा अर्ज माझे ताब्यात घेतला.

तद्नंतर मी व सपोआ नावडकर यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार हे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर व्हॉट्सअप कॉल करुन भेटीचे वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत. त्यानुसार आम्ही व दोन्ही पंच व तकारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. रावराणे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून तकारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार हे लोकसेवक श्री तुषार काळे यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९८९२०६९४६६ यावरुन स्पीकर ऑन करून लोकसेवक श्री. तुषार काळे यांस त्यांचे मोबाईल नं. ८८८८९३०५७५ यावर व्हॉट्स अप कॉल करून ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी लोकसेवकास भेटण्याबाबत विचारणा केली असता,लोकसेवकाने उदयाची डयुटी बधुन संध्याकाळी फोन करतो असे सांगितले व फोन बंद केला.

त्यानंतर लोकसेवक यांचा फोन आला नाही म्हणुन परत दिनांक २०/०१/२०२६ रोजी वरीलप्रमाणे पडताळणी कारवाई केली व त्यामध्ये पंच १ श्री नरवडे व तक्रारदार हे लोकसेवकास भेटण्याकरीता ते बसत असलेल्या खार रेल्वे स्टेशन पोलीस बीटचौकीमध्ये प्रत्यक्ष गेले असता, तेथे लोकसेवक उपस्थित नव्हते व ते लोकसेवक हे सुट्टीवर असल्याचे समजले.तक्रारदार यांची लोकसेवकशी भेट झाली नाही म्हणुन सदर रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

तदनंतर पुन्हा दिनांक २१/०१/२०२६ रोजी व दिनांक २२/०१/२०२६ रोजी स्वतंत्रपणे मोबाईल फोनदवारे पडताळणी कारवाई केली यामध्ये तक्रारदार हे लोकसेवक श्री तुषार काळे यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९८९२०६९४६६ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक श्री.तुषार काळे यांस त्यांचे मोबाईल नं. ८८८८९३०५७५ यावर व्हॉट्स अप कॉल करून ध्वनिमुद्रीत करण्यात आला.लोकसेवक यांचा व्हॉटसऑप कॉल रिंगींग होत होता परंतु लोकसेवक यांनी सदरचा कॉल स्विकारला नाही. कारवाईमध्ये लोकसेवक श्री. तुषार काळे यांचे तकारदार यांचे सोबत फोनवर व्हॉटअप कॉलद्वारे संभाषण झाले नसल्यामुळे समक्ष भेटण्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणुन सदर दोन्ही दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दरम्यानच्या काळात तक्रारदार यांचे भाउ नुर यांची सासु वारल्याने तसेच मुळ गावी चिपळुण येथे खाजगी कामानिमीत्त गेले होते व ते परत मुंबईत आल्यानंतर दिनांक २०/०२/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयात आले. पडताळणी कारवाई करणे असल्याने पंचाना बोलावण्यात आले. तद्नंतर मोबाईलदवारे व्हाटसअप कॉलदवारे पडताळणी केली असता, नमुद संभाषणामध्ये लोकसेवक यांनी तकारदार यांना संध्याकाळी या असे सांगितले यावर तकारदार यांनी उदया येतो असे लोकसेवक यांना कळविले परंतु लोकसेवक यांनी तकारदार यांना आठ नंतर येण्यास सांगितले त्यास त्यांनी ओके सांगितले. मात्र तकारदार यांचे वैयक्तीक कारणामुळे त्यांनी आठ नंतर लोकसेवकाची भेट घेणे शक्य होणार नाही असे सांगितल्याने त्या दिवशीची कारवाई करता आला नाही.

तदनंतर तक्रारदार हे दिनांक १२/०३/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयात आले व त्यांनी लोकसेवक यांनी त्यास दिनांक १०/०३/२०२६ रोजी व्हाटसअप कॉल केल्याचे मात्र त्यांनी तो उचलला नसल्याचे सांगितले.

समक्ष

(रेश्माबाई [illegible])
पोलीस निरीक्षक
[illegible]

सदरवेळी पडताळणी कारवाई करणे असल्याने पंचाना बोलावण्यात आले. यामध्ये पंच क्रमांक २ श्रीमती रुपाली शंकर गागरे या बालसंगोपन रजेवर गेल्याने त्यांच्या बदली पंच क्रमांक २) श्रीमती शितल श्रीकांत लाडके, वय ४० वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - शिधावाटप निरीक्षक, कार्यालयीन पत्ता - ३१/ई, माटुंगा रेशनिंग ऑफिस, पी. डब्ल्यु.डी कंपाऊड, माटुगा, मुंबई १९. रा.ठि - ई/१२-१-१, ड्रिमलँड को.हा.सो., सेक्टर ४, सानपाडा, नवी मुंबई ४००७०५. यांना बोलावण्यात आले. तद्नंतर मोबाईलदवारे व्हाटसअप कॉलदवारे पडताळणी केली असता, नमुद संभाषणामध्ये लोकसेवक यांनी उदया दिवसभरात फोन करुन येण्यास सांगितले यावर तक्रारदार यांनी ओके सांगितले.

दिनांक १३/०३/२०२६ रोजी १७.१८वा पुर्वीप्रमाणे मोबाईल फोनदवारे पडताळणी कारवाई केली यामध्ये तक्रारदार हे लोकसेवक श्री तुषार काळे यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. रावराणे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९८९२०६९४६६ यावरून स्पीकर ऑन करून लोकसेवक श्री. तुषार काळे यांस त्यांचे मोबाईल नं. ८८८८९३०५७५ यावर व्हॉट्स अप कॉल करून ध्वनिमुद्रीत करण्यात आला. लोकसेवक यांचा व्हॉटसऑप कॉल रिंगींग होत होता परंतु लोकसेवक यांनी सदरचा कॉल स्विकारला नाही. म्हणुन तक्रारदार व पंच क्रमांक १ श्री नरवडे हे प्रत्यक्ष खार पोलीस ठाणे येथे जावुन लोकसेवकाची भेट घेतील असे ठरले म्हणुन तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्रमांक १ याच्यासह १८. ०१ वा रवाना केले परंतु लोकसेवक हे कार्यालयात नसल्याने ते परत आले. तदनंतर १८.२९ वा लोकसेवक यांचा तक्रारदार यांना फोन आला व त्यांनी तक्रारदार यांना खार पोलीस ठाणेमध्ये भेटण्यास बोलावले. तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्रमांक १ याच्यासह १ ८.४९ वा रवाना केले व त्यांची लोकसेवक यांचेशी भेट झाली व भेटीदरम्यान त्यांच्यात झालेले संभाषण हे ध्वनीमुद्रीत झाले असुन त्यामध्ये नमुद संभाषणामध्ये तक्रारदार हे लोकसेवक यांना भेटायला आले नाहीत म्हणुन लोकसेवक रिपोर्ट पाठवुन देणार होते यावर बोलणे झाले.

त्यांनतर तक्रारदार यांनी कस करायच आता अशी लोकसेवकास विचारणा केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना " **तुम्हीच सांगा काय करायचयं.... तुम्हीच बोला, स्पष्ट बोला काय ते.. ठेवु नका.. मनात नका ठेवु. .. जे काय असेल ते स्पष्ट बोलुन टाका** " असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी " जे तुम्ही बोललेलात ते जरा जास्त होतायत, त्याच्या हिसाबाने करा... असे म्हटले असता लोकसेवक तक्रारदार यांना **तुमच्या साईडने येवु द्या ना.. काय ते.. मी ते बोलतोय.. तुम्ही बघा.. माझ्या साईडच पण तुम्हाला मान्य** नाय.. **तुमच्या साईडने पण तुम्ही बोलत नाय.. पुढे जात नाय काम महत्वाच... तुमच्या साईडने बोला ना काय ते**....असे म्हणाले असता तक्रारदार यांनी तुम्ही बोललेला होता..तीन.., तुम्ही जरा हिसाबाने काय करा ना.. असे बोलेले. त्यावर लोकसेवक **यांनी तुमच्या साईडने येवु द्या ना म**...असे म्हटले असता तक्रारदार यांनी **एक देतो... एक पर्यंत** जरा बघा ना... **बहुतेक** असे सांगितले असता लोकसेवक यांनी **कधी पर्यंत देणार**... अशी विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी **एक दोन दिवसात बंदोबस्त करायला लागेल** असे सांगितले. तक्रारदार यांनी लोकसेवक यांना निघु का असे विचारले त्यावेळी **लोकसेवक यांनी त्यांचे मोबाईल फोनवर दिड लाख टाईप** करुन दाखवले. तक्रारदार यांनी परत **दिड करताय असे विचारले** असता लोकसेवक **यांनी कमी होत नाय, सिनीयर, सिनीयर आहे, क्राईम पीआय. आहे. बाकी तुमच्यासाठी चाललयं सगळं, तुम्हाला थोडसं ॲडजस्ट कराव लागेल** असे पंच क्र ०१ यांचे समक्ष सांगितले – त्यावेळी तक्रारदार यांनी दिड लाख **देण्याकरिता दोन दिवसाचा वेळ मागीतला त्यावर लोकसेवक यांनी रिपोर्ट पॉझीटीव्ह देणार असे सांगितले.**

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष झालेल्या भेटीदरम्यान झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. तुषार काळे हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही दिनांक १५/०३/२०२६ किंवा १६/०३/२०२६ रोजी खार पोलीस ठाणे येथे घेवुन येण्यास सांगितले त्यामुळे पुढील सापळा कारवाई ही दिनांक १६/०३/२०२६ रोजी करण्याचे ठरले.

दिनांक १६/०३/२०२६ रोजी तक्रारदार, पंच व पोलीस पथक असे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर मी व सपोआ प्रविण नावडकर यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये दिड लाख इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार मपोशि साळवी/१५०९८२ यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील लाचेची रक्कम रू. १,५०,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ३०० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या.

दिनांक १६/०३/२०२६ रोजी खार पोलीस ठाणे येथे सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यावेळेस पोलीस पथक खार पोलीस ठाणे बाजुला सेकेड हार्ट बॉईज हायस्कुल,सांताक्रुझ पश्चिमचे गेट कमांक ६,९ वा खार रोड,खार पश्चिम,मुंबई येथे सापळा रचून थांबलेले होते. लोकसेवक यांनी फोन करुन येण्यास सांगितल्याने,त्याच ठिकाणी तांत्रिक शाखचे पोह रावराणे यांच्या मदतीने व्हाईस रेकॉर्डमध्ये माझे,तकारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य घेवुन लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेट ठिकाण व वेळ निश्चितीसाठी तकारदार यांच्या फोनवरुन लोकसेवक यांना १६.१७ वा व्हाटसअप काल केला असता,लोकसेवक यांची फोन रिंगींग झाला मात्र त्यांनी फोन उचलला नाही व थोडयावेळाने १७.०० वा. लोकसेवक यांचा तकारदार यांना व्हाटसअप कॉल आला व सातच्या नंतर फोन करुन भेटण्यास बोलावले. तदनंतर पुन्हा तक्रारदार यांनी लोकसेवक यांना १९.४१ वा. व्हाटसअप कॉल केला असता,फोन लागला नाही. थोडयावेळाने लोकसेवक यांचा तकारदार यांना २०.३९ वा व्हाटसअप कॉल आला व त्यांनी पोलीस ठाणे येथे भेटण्यास बोलावले. त्यानंतर मी व पोलीस पथकातील पोशिचा कमांक ०७१६५६/देसाई यांनी पंच व तकारदार यांना ॲथ्रोसिन पावडरचे गूणधर्म समजावून सांगितले. पोशि चालक देसाई याचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.१,५०,०००/- रक्कमेच्या रु. ५०० दराच्या ३०० नोटा अशी लाचेची रक्कम एकत्रित करुन नमुद रक्कमेस ॲथ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एकत्रित करुन केसरी रंगाच्या कागदी लिफाफयात ठेवुन सदर लिफाफ्यासदेखील बाहेरुन ॲथ्रोसिन पावडर लावून तो लिफाफा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या समोरच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी, पंच,तकारदार व पोलीस पथका यांना पोशि चालक देसाई हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

तक्रारदार व पंच क्र. १ श्री. नरवडे हे २१.१४ वा खार पोलीस ठाणे येथे गेले. मी व उर्वरीत पोलीस पथक व पंच कमांक २ श्रीमती शितल लाडके असे खार पोलीस ठाणेचे आजुबाजुला तकारदार दिसतील अशा रीतीने थांबुन राहीलो. थोडयावेळाने लोकसेवक श्री तुषार काळे हे खार पोलीस ठाणे प्रवेश गेटजवळ आले व त्यांनी तकारदार यांना घेवुन पोलीस ठाणेचे पाठीमागील शासकीय वसाहत बिल्डींग कमांक ५ व ६ च्या मध्ये असलेले अधिकारी निवारा म्हणुन वापरात असलेले कंटेनर येथे घेवुन गेले व सोबत असणारे पंच क १ यांना बाहेर थांबण्यास सांगितले व तकारदार यांना घेवुन ते अधिकारी निवारा कंटेनरच्या आतमध्ये घेवुन गेले. काही वेळानंतर तक्रारदार यांनी आमच्या व्हाटसअपवर थंब(अंगठा) निशान पाठवुन लोकसेवकाने लाच स्विकारलेबाबत पूर्वनियोजित इशारा दिला. त्यानंतर मी व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री. तुषार काळे यांना २२:०० वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.तुषार तात्यासाहेब काळे वय-४० वर्ष,व्यवसाय- नोकरी (सहायक पोलीस निरीक्षक,नेमणुक-खार पोलीस ठाणे) राठी : १०३,बिल्डींग नं. १४,सागर दर्शन को.ऑप.हौ.सोसायटी,सेक्टर १०,ऐरोली,नवी मुंबई असे सांगितले.

तरी आरोपी लोकसेवक श्री.तुषार तात्यासाहेब काळे वय- ४० वर्ष,व्यवसाय- नोकरी (सहायक पोलीस निरीक्षक,नेमणुक-खार पोलीस ठाणे) यांनी स्वत: करीता तक्रारदार नामे श्री रफिक इब्राहिम तांबे यांचेकडे , त्यांचे भाऊ नुर मोहम्मद तांबे याने त्याची महाराष्ट्र फ्लोअर मिल, शॉप नं. ७०, प्लॉट नं. १९, सी.एस.टी. ७७९, ३ रा रोड, खार रोड, खार(प) मुंबई ४०००५२ या प्रॉपर्टी संदर्भात मा. अति मुख्य महानगर दंडाधिकारी, ९ वे न्यायालय, बांद्रा येथे केलेली क्रिमिनल केस क. १२१/एस. डब्ल्यु/२०२२ या प्रकरणामध्ये सी.आर.पी.सी.कलम २०२ प्रमाणे चौकशी करुन तक्रारदार यांच्या बाजूने चौकशीचा अहवाल मा.न्यायालयात सादर करण्याकरीता रु. ३,००,०००/- इतकी लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.१,५०,०००/-स्विकारण्याचे दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या पडताळणीमध्ये मान्य केले. तसेच दिनांक १६/०३/२०२६ रोजी सापळा कारवाईदरम्यान आलोसे यांनी स्वत:करीता रू. १,५०,०००/- इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी आलोसे श्री.तुषार काळे यांच्या विरोधात भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(रेखाबाई दुधभाते )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तक्रारदार यांचे तक्रार अनुषंगाने पडताळणी कार्यवाही करून गुन्हा दाखल

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... —

Total Value of properties stolen / involved

(8) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी त्यांच्याकडे तक्रारदार श्री. शफिक तोले यांचा भाऊ जुबेर तोले यांची महाराष्ट्र प्रोग्रेस मॉल, शॉप नं. 70, प्लॉट नं 19,15 + 229, 3 रा रोड, खार. या प्रॉपर्टी संदर्भात मा. अति मुख्य महानगर दंडाधिकारी 3 प न्यायालय वांद्रा येथील क्रिमिनल केस क्र. 121/SW/2022 या प्रकरणामध्ये तक्रारदार यांच्या बाजूने चौकशीचा अहवाल मा. न्यायालयात सादर करण्याकरीता तक्रारदाराकडे स्वतः करिता रु 3 लाखाची मागणी करून तडजोडीअंती रु 1.5 लाख स्विकारण्याचे मान्य करून रु 1,50,000/- लाच स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून त्यांच्याविरोधात भ्र.प्र.अ. क 7 अन्वये

3. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या गुन्हा नोंद

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक रेखाबाई दुधभाते

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... रेखाबाई दुधभाते

पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ......

Posting

Code No. of I. O. ......

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...... 17/03/2026

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत<br>Copy to | 2. फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report